# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 07/10/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई
### पोलीस ठाणे बुट्टीबोरी अंतर्गत शांती लॉन सातगाव जवळुन चोरी गेलेल्या एकुण 12 नविन मोबाईल फोन चोरीच्या घटनेचा उलगडा

स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक दिनांक 06.10.2021 रोजी पोलीस स्टेशन बोरी परिसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना मुखबिराकडुन माहिती मिळाली की, सातगाव येथे राहणाऱ्या एका विधी संघर्षग्रस्त बालकाजवळ विवो कंपनीचे मोबाईल फोन असुन ते चोरी चे असण्याचा संशय आहे. प्राप्त माहितीची शहानिशा करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांनी त्यांचे अधिनस्त विशेष पथकाला नेमले. त्यावरून विशेष पथकाने सातगाव येथे जावुन शहानिशा केली असता मुखबिराने दिलेली माहिती खरी असल्याचे आढळुन आले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सातगाव येथुन विवो ए 12 या मॉडलचे एकुण 12 नग नविन मोबाईल फोन व 06 नग चार्जर असा एकुण 1,13,400/- रू. किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. सदर मोबाईल फोन हे पोलीस स्टेशन बुट्टीबोरी गुन्हे रजिस्टर नं. 435/2021 कलम 379 भादंवि या गुन्हयात दिनांक 24.08.2021 रोजी चोरी गेल्याचे उघड झाले आहे. सदर चोरी प्रकरणात एका विधी संघर्षग्रस्त बालक याने शांती लॉन सातगाव येथुन एका मोटर सायकलीला अडकवलेली मोबाईल ठेवुन असलेली बॅग मोठया शिताफिने चोरी केली असल्याचे समोर आले आहे. याबाबत पुढील तपास पोलीस स्टेशन बुट्टीबोरी करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार, सपोनि जितेंद्र वैरागडे पोलीस उपनिरीक्षक जावेद शेख, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, महेश जाधव, पोलीस नायक रामराव आडे, दिनेश आधापुरे, पोलीस शिपाई अमृत किनगे, सतिश राठोड, चासफौ साहेबराव बहाळे यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर